# “महाराष्ट्राच्या सामाजिक पुनर्रचनेच्या चळवळीत सार्वजनिक जीवनातील स्त्रिया : एक आढावा”

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

**स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड मानव्यविद्या शाखेअंतर्गत इतिहास विषयातील पीएच्.डी.पदवीसाठी सादर करण्यात आलेला शोधप्रबंधाचा प्राथमिक आराखडा**

*** संशोधक ***

***आकाश अरुणराव पाटील***

*** मार्गदर्शक ***

***प्राचार्य डॉ.आर.एस.फुन्ने***

स्वर्गीय नितीन महाविद्यालय, पाथरी
ता.पाथरी, जि. परभणी

**मार्च २०२३**

## १.१ प्रस्तावना :-

आधुनिक भारतात आणि महाराष्ट्रात गेल्या १०० वर्षांपेक्षा अधिक काळापासून प्रबोधनाची परंपरा निर्माण झालेली दिसून येते. या परंपरेवर विचारांची मोठी छाप आहे तसेच भारतात उगम व विस्तार पावलेले आणि मुस्लीम व इंग्रजी राजवटीत येथील मातीत रूजलेले विविध धर्म प्रवाहही आहेत. याच पार्श्वभूमीवर सर्वच धर्मातील चांगल्या विचारांचे मिश्रण भारतीय संस्कृतीत झालेले आहे. विविध पंथ आणि उपपंथ, त्यांचे पुरस्कर्ते, संत व महात्म्यांनी आपआपल्या मार्गातून मानवतेची शिकवण येथे पेरलेली आहे. समता, बंधुता, न्यायाचा व माणुसकीचा उद्घोष येथे निनादत असतानाच देव आणि धर्माच्या नावावर अमानुष शोषणाची परंपरा निर्माण करून तिचे पद्धतशीर संवर्धन व संरक्षण करण्याचेही काम येथे झाले आहे. आलेला नवा विचार स्वीकारणे येथे जसे दिसून येते, तसेच अन्याय, अत्याचाराचा विचार येथील माणसाला रूचत नाही. बंडखोरी, मग ती राजकीय असो की सामाजिक अथवा धार्मिक, तिच्या समर्थनार्थ येथील माणूस सदैव तयार असतो. अशाही परिस्थितीत महाराष्ट्रात नवनिर्माणाशी असलेला संबंध नवसमाज निर्माण करण्याच्या उद्देशाने ज्या पद्धतीने वास्तवाला आकार देण्यासाठी प्रबोधनाचे कार्य केले ते उल्लेखनीय आहे.

आधुनिक महाराष्ट्रासाठी १९ वे शतक हे अतिशय महत्त्वपूर्ण मानले जाते. याच काळात पुरोगामी विचारांचा उदय होऊन येथील समाजव्यवस्थेत परिवर्तन करून समता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला गेलेला आहे. जेंव्हाजेंव्हा अशा विचारधारेला संपवण्याचा प्रयत्न इतिहासाच्या सहाय्याने झाला, त्यातून स्त्री जातही सुटली नाही. स्त्रियांचे बहुमोलाचे व विषमतावादी व्यवस्थेविरूद्ध कार्य ते प्रतिगामी

शक्तीने जनतेला कळू दिले नाही. आजही स्त्रीशिक्षणाला होणारा विरोध, प्रथा–परंपरेचे होणारे पुनःरूज्जीवन, दैनंदिन स्त्रियांवर होणारा अत्याचार, विविध क्षेत्रात होणारे तिचे शोषण, कलाप्रसार माध्यमातून होणारा तिचा वापर, विटंबना असे चित्र आपल्या डोळ्यासमोर उभे राहते. खरेतर १८४८ पासून अनेक स्त्रियांनी सावित्रीबाईंबरोबर व सावित्रीबाई फुलेंच्या पश्चात ध्ययेवादाने प्रेरित होऊन प्रबोधनाची परंपरा या महाराष्ट्रात चालू ठेवलेली आहे. धार्मिक कायदा व रूढी–परंपरांना व नियमांना, धमक्यांना न घाबरता अगदी पुरुषांच्या बरोबरीने कार्य केलेले आहे. मात्र, स्त्रियांची प्रबोधनाची ही भूमिका समाजासमोर आणण्याऐवजी ती जाणुनबुजून दुर्लक्षित ठेवली गेल्याचे लक्षात येते. तिचे विचार, कार्य, लेखन, तिची कृती येथील प्रतिगामी शक्तींनी व पुरुषी मानसिकतेने प्रकाशझोतात येऊ दिले नाही. पुरुषांप्रमाणेच स्त्रियांचेही त्यामध्ये विशेषतः महिला समाजसुधारकांचे योगदान बहुमोल असे आहे. ते संशोधनरूपाने समाजासमोर यावे हे गरजेचे वाटते. धर्म, जात, स्त्री–पुरुष भेद व विषमतेला छेद देऊन सर्व जातीधर्मातील स्त्रिया उदयाला आल्या. त्यांनी केवळ विशिष्ट स्त्रीवर्गासाठीच कार्य केले नाही तर समस्त समग्र स्त्रीजातीच्या उद्धारासाठी संस्थात्मक पातळीवर कार्य केले. या प्रबोधन चळवळीच्या माध्यमातून विविध जाती–धर्माच्या स्त्रिया एका व्यासपीठावर आल्या व आधुनिक महाराष्ट्राच्या सामाजिक पुनःर्रचनेच्या त्या पाईक बनल्या. स्त्रीवादी चळवळ ही एक एकमेव अशी चळवळ आहे ज्यामध्ये विविध धर्म, जातीच्या स्त्रिया कुठल्याही अटीवर सहभागी न होता, कोणाच्याही दबावाखाली न येता स्वकर्तृत्त्वाने, स्वमताने, स्वईच्छेने या चळवळीत सामिल झाल्या व याच माध्यमातून त्यांनी पिचलेल्या, रंजलेल्या, गांजलेल्या, रूढी आणि परंपरेला ग्रासलेल्या स्त्रियांना या विचारातून बाहेर काढण्याचा

प्रयत्न केला आहे. या स्त्री उत्थानाच्या माध्यमातूनच हे सामाजिक कार्य त्यांनी पार पाडले.

महाराष्ट्राच्या सामाजिक पुनर्रचनेच्या चळवळीचे नेतृत्त्व सावित्रीबाई फुले, पंडिता रमाबाई, ताराबाई शिंदे, रमाबाई रानडे यांच्यापासून ते अनुताई वाघ, सिंधुताई सपकाळ या समर्थ स्त्रियांनी पेलल्याचे दिसून येते. पुरुष समाजसुधारकांपेक्षा कणखर अधिक सरसच कार्य या स्त्रियांनी केल्याचे आढळून येते. याबाबतचे स्वरूप समजावून घेताना, वरील थोर व्यक्तींचे कार्य आपल्या लक्षात येते. परंतु ऐतिहासिकदृष्ट्या केवळ थोर व्यक्ती म्हणून त्यांचा विचार करणे हे फलदायी होणार नाही तर निरनिराळ्या प्रवाहाचे प्रतिनिधी किंवा प्रणेते म्हणूनच आपण त्यांच्याकडे पाहिले पाहिजे. युगप्रवर्तक नेते म्हणून या पार्श्वभूमीवर त्या-त्या युगातल्या प्रेरणा आणि प्रवाह कोणते व त्यांच्या परस्पर संबंधातून वास्तव कसे घडत गेले हे लक्षात घेणे आवश्यक आहे. महाराष्ट्राच्या या दिडशे वर्षाच्या इतिहासाला भारतीय सामाजिक चळवळीची पार्श्वभूमी आहे. विशेषत्त्वाने महाराष्ट्रातल्या वारशाची प्रासंगिकता पाहता, या ठिकाणी गेल्या हजार वर्षांमध्ये आपल्या समाजात अनेक राजकीय स्थित्यंतरे मोठ्या प्रमाणात झाली. प्रारंभी यादवांचे राज्य जाऊन बहामनी राज्य आले. नंतरच्या कालखंडात आदिलशाही, निजामशाही, कुतुबशाही इत्यादी राजवटी अस्तित्त्वात येऊन पुढे मराठे, पेशवे हेही सत्तेवर आले. अशा तऱ्हेची राजकीय स्थित्यंतरे झाली. परंतु यामुळे सामाजिक जीवनात मूलगामी असे बदल घडून आलेले दिसत नाहीत. शतकानुशतके वहिवाटीत असलेल्या जातिसंस्था, ग्रामसंस्था या अशाच पद्धतीने चालू राहिल्या. खरे तर या देशात इंग्रज राजवट प्रस्थापित झाल्यानंतर सामाजिक स्थित्यंतराला सुरुवात झालेली लक्षात येते. त्या पूर्वीच्या समाजात बदल होतच नव्हते

असे नाही परंतु त्यामुळे एकंदर समाजव्यवस्थेची चौकट बदलण्याइतके ते प्रभावी नव्हते. मध्ययुगाच्या नंतर बऱ्याचअंशी परिवर्तन झाले. मध्ययुगाच्या हजार वर्षात ज्याला आपण सामाजिक क्रांती म्हणतोत अशा तऱ्हेचा मूलगामी, सर्वंकष बदल परंपरागत समाजव्यवस्थेत घडून आलेला नाही. मात्र ब्रिटिश आगमनानंतर खऱ्या अर्थाने एक राजकीय स्थित्यंतराच्या पाठोपाठ सामाजिक परिवर्तनाची मुहूर्तमेढ रोवल्या गेली.

स्त्रीशिक्षणाचे महत्त्व व त्यांच्या प्रचारासाठी आणि समग्र स्त्रियांच्या उन्नतीसाठी तळमळीने कार्य करत राहणाऱ्या कर्तृत्त्ववान स्त्रियांमध्ये प्रामुख्याने सावित्रीबाई फुले, पंडिता रमाबाई, ताराबाई शिंदे, रमाबाई रानडे यांच्यापासून ते आधुनिक कालखंडातील विशेष करुन सिंधुताई सपकाळ पर्यंत समर्थ स्त्रियांनी हे सामाजिक कार्य केल्याचे दिसून येते. पुरुष समाजसुधारकांपेक्षा कणखर व अधिक विलोभनिय सरसच कार्य या समाजसुधारक स्त्रियांनी केल्याचे आढळते. महाराष्ट्राच्या प्रबोधनचळवळीचा मागोवा घेत असताना, अनेक पुरुष समाजसुधारकांनी कार्य निश्चितपणे चांगले केले परंतु या तोडीस तोड म्हणून बोटावर मोजण्याइतक्या स्त्रियांनीसुद्धा समाजकार्य करत असताना कशाचीही तमा न बाळगता, अगदी निरपेक्ष भावनेने स्त्रियांच्या उद्धारासाठी आपले सबंध जीवन वेचले. प्रामुख्याने तत्कालीन समाजव्यवस्थेने जाणीवपूर्वक दुर्लक्षित व काळाच्या पडद्याआड टाकल्यामुळे स्त्रियांचे शोषण आणि संघर्षाला वाचा फोडण्याचे मार्ग तत्कालीन कालखंडात बंदच झाले होते. महाराष्ट्रातील सामाजिक, सांस्कृतिक व वैचारिक परिवर्तनास जीवंत ठेवणारी एक महान स्त्री म्हणून त्यांच्या कार्याची दखलच घेतली गेली नाही. त्यामुळेच महाराष्ट्राच्या सामाजिक इतिहासाला समानतेचे, एकात्मतेचे व मानवतेचे वळण

लावणारी ही खरीखुरी धारा होती. कदाचित या धारेला नवीन प्रवाह मिळाले असते तर, महाराष्ट्रातील स्त्रियांचा इतिहास हा वेगळा असता, परंतु दुर्दैवाने असा प्रकार स्त्रियांच्या बाबतीत लिहिल्या गेला नाही. किंबहुना तो प्रकाशझोतात प्रस्थापित व्यवस्थेने येवू दिला नाही. परिणामी, कर्तृत्ववान स्त्रियांचे कार्य, त्यांची चळवळ, त्यांचे विचार, त्यांनी केलेले समाजप्रबोधन व योगदान हे जगासमोर येण्यासाठी १९७० चे दशक उजाडावे लागले. अशा पार्श्वभूमीवर विविध धर्माच्या, जातीच्या कर्तृत्ववान स्त्रियांचे कार्यकर्तृत्व समाजासमोर आले पाहिजे, आज जी स्त्री शिकलेली आहे, नौकरी करते आहे, विवेक, विचार आहे, कुटुंबाकरीता ती आधारवड बनते आहे, या सगळ्या गोष्टींमागे प्रबोधन काळात ज्या स्त्रियांनी हे शिवधनुष्य उचलले, त्याचा परिणाम आधुनिक कालखंडात सबंध स्त्रियांच्या जीवनावर झालेला दिसून येतो.

याच अनुषंगाने, भारतीय समाज व्यवस्थेत असणारी विषमतेची उतरंड ही त्यांना मान्य नव्हती. वर्णव्यवस्था, जातीव्यवस्था, लिंगव्यवस्था या सर्व विषमतेवरच त्यांनी आघात केलेला दिसतो. मनुष्याला लिंग, वर्ण दर्जा यात तफावत असली तरी माणूस म्हणून कुठेतरी सारखाच आहे, सर्व माणसे ही ईश्वराची लेकरे आहेत. त्यांच्यामध्ये कुठल्याही प्रकारची भेदाभेद असता कामा नये, तेंव्हा या पातळीवर सर्वांना सारखीच वागणूक मिळावी असा त्यांनी आशावाद व्यक्त केला होता.

त्याचप्रमाणे २० व्या शतकातील भारताच्या सामाजिक, सांस्कृतिक सुधार चळवळीच्या इतिहासात महिला सक्षमीकरणामध्ये महत्त्वाच्या स्त्रियांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. त्यातील एक पंडिता रमाबाई या होत. या महिलांच्या कार्याचा प्रभाव समाजमनावर पडलेला आहे. त्यांनी सबंध विधवांसाठी आणि

महिलांच्या शिक्षणासाठी महत्त्वपूर्ण कार्य केले आहे. खरे तर पंडिता रमाबाई यांचे जीवन आणि कार्य हे सामाजिक आणि धार्मिकता लक्षात येण्यासाठी खूप महत्त्वाचे आहे. महाराष्ट्रातील सुधार चळवळ म्हणून त्यांच्याकडे आजही पाहिले जाते. आई–वडिलांच्या निधनानंतर रमाबाईंनी आपल्या भावाबरोबर प्रवास करून उत्तर–पश्चिम भारत व नंतर कलकत्ता आदी ठिकाणी भ्रमंती करून अनेक ठिकाणी महिलांमध्ये शिक्षणाच्या संदर्भात स्त्रियांना मुक्ती आणि प्रसुती आणि बालविवाहासारख्या वाईट प्रथांना विरोध करून महिला मुक्तीसाठी अनेक प्रकारच्या संस्था स्थापन केल्या. याचाही प्रभाव समाजमनावर प्रचंड प्रमाणात पडलेला आपणास लक्षात येतो.

तसेच भारतीय स्त्री म्हणून रमाबाई रानडे यांचे कार्य भारतीय इतिहासात उल्लेखनिय असे राहिलेले आहे. रमाबाई रानडे ह्या न्यायमुर्ती माधव गोविंद रानडे यांच्या पत्नी होत. रानडे हे एक महान समाजसुधारक, प्रतिष्ठित न्यायाधिश, अभ्यासक आणि लेखक होते. त्यांच्या निधनानंतर रमाबाई रानडे अनेकदा सामाजिक कार्याच्या अनुषंगाने अनेकांशी चर्चा करीत असत. त्यांनी एक दत्तक मुलगी घेतली होती. पुढे तिलाही शिक्षणाच्या प्रवाहात आणले. रमाबाई रानडे ह्या आधुनिक भारतातील महिला चळवळीच्या प्रणेत्या आहेत. विशेष रूपाने त्या भारतीय महिला संस्थांमध्ये सर्वात यशस्वी म्हणून त्यांची कारकीर्द ओळखली जाते. भारतातील हजारो महिला त्यांच्या संस्थेशी संबंधित असून, त्या समाजाच्या वाढीसाठी रमाबाईच्या जवळच्या वैयक्तिक देखरेखीमुळे त्यांचा विस्तार संपूर्ण भारतभर झालेला आहे आणि यामुळेच इतिहासाचा एक महत्त्वाचा दुवा कायम आहे.

अशाप्रकारे अनुताई वाघ, सिंधुताई सपकाळ यांच्यासुद्धा कार्याचा प्रभाव महाराष्ट्रातील प्रबोधन चळवळीवर महिला समाजसुधारकांनी केलेल्या कार्यामुळे,

योगदानामुळे पडलेला दिसून येतो. अर्थात हे सर्व कार्य करीत असताना त्यांना आलेल्या अनेक अडचणींवर मात करीत त्यांनी समाजप्रबोधनाचे कार्य जीवनाच्या शेवटच्या घटकापर्यंत चालूच ठेवले. हे कार्य उजेडात येण्याच्या दृष्टीने संशोधन होणे महत्त्वाचे असल्याकारणाने प्रस्तुत संशोधन करण्यात येणार आहे.

## १.२ संशोधनाचे महत्त्व :-

१९ व्या शतकाच्या आरंभी महाराष्ट्रातील स्त्रीजीवन धर्म, जाती व पितृसत्तेच्या चौकटीत बंदिस्त झाले होते. किंबहुना 'चूल आणि मुल' याशिवाय बाकी विश्व कोणतेही नाही अशी समजूत सबंध स्त्रीजातीची होती. माणूस म्हणून कोणतेही अधिकार स्त्रीला नव्हते. रूढी, परंपरा, कर्मकांड, व्रतवैकल्ये इत्यादींनी तिला जखडून टाकले होते. जातिनिहाय तिचे शोषण होत होते. अर्थात हे काही सामान्य स्त्रियांच्या बाबतीत होते असे नाही तर उच्चवर्णीय म्हणजेच ब्राह्मण जातीतील स्त्रियांनासुद्धा येथील मनुवादी व्यवस्थेने दुय्यम दर्जाची ठरविले होते. तिला कोणत्याही प्रकारचा अधिकार व हक्क असा नव्हता. धर्मव्यवस्था व पुरुषसत्ताक अशा दुहेरी अवस्थेतून शोषित होता, तर शुद्रातिशुद्र बहुजन स्त्री कुटुंबव्यवस्था, धर्मव्यवस्था व जातिव्यवस्था अशा तिन्ही अवस्थेतून तिचे शोषण होत होते.

अशा प्रतिकुल व प्रतिगामी व्यवस्थेच्या विरोधात विशेषतः १९ व्या शतकात प्रबोधन चळवळीच्या रूपाने सर्वसामान्य स्त्रियांच्या बाबतीत आमुलाग्र असा बदल झालेला दिसतो. स्त्री जातीचे, तिच्या समस्यांचे निर्मुलन करण्यासाठी विशेषत्त्वाने महाराष्ट्राच्या प्रबोधन चळवळीचे नेतृत्त्व सावित्रीबाई फुले, पंडिता रमाबाई, ताराबाई शिंदे, रमाबाई रानडे यांच्यापासून ते अलिकडच्या काळातील सिंधुताई सपकाळ पर्यंत

समर्थ स्त्रियांनी हे प्रबोधनाचे कार्य समर्थपणे पेलल्याचे दिसून येते. स्त्रियांमध्ये आत्मसन्मान व आत्मभान मिळवून द्यायचा असेल तस शैक्षणिक क्रांतिचा जागर पूर्ण केल्याशिवाय पर्याय नाही याची पूर्ण खात्री सावित्रीबाई फुले यांना असल्यामुळे साहजिकच त्यांनी स्त्रीशिक्षणाचा विडा उचलला व त्याच दृष्टिकोनातून त्यांनी आपले कार्य सुरुही केले. त्यांच्या बरोबरीनेच पुढे अनेक समाजसुधारक स्त्रियांनी या कार्याप्रती स्वतःला या समाजकार्यात झोकून दिल्यामुळे साहजिकच आज पुरुषांच्या बरोबरीने स्त्रिया वाटचाल करताना दिसत आहे. अर्थात हे सर्व काही १९ व्या शतकातील महाराष्ट्राच्या प्रबोधन चळवळीत सामाजिकदृष्ट्या दुय्यम मानलेल्या स्त्रियांना आत्मभान देवून त्यांचा अभिमान जागृत करण्याचे कार्य या समाजप्रबोधन करणाऱ्या समाजसुधारक स्त्रियांनी केल्यामुळेच साहजिकपणे त्यांच्या कार्याचे, विचाराचे समाजावर निश्चितपणे चांगले परिणाम झालेले दिसून येतात. अशा या प्रखर परिवर्तनवादी स्त्रियांच्या कार्याची, कृतीची प्रशंसा करणे, त्यांचा वेध घेणे हे माझ्या विषयाचे महत्त्व जाणून ''महाराष्ट्राच्या सामाजिक पुनर्रचनेच्या चळवळीत सार्वजनिक जीवनातील स्त्रिया : एक आढावा'' हा विषय संशोधनासाठी निवडला आहे.

## १.३ संशोधनाची उद्दिष्ट्ये :-

कोणत्याही सामाजिक शास्त्राच्या संशोधनास सुनिश्चित रूप प्रदान करण्यासाठी काही ध्येये व उद्दिष्ट्ये नोंदवावी लागतात. त्या आधारे आपण त्या अध्यापनास एक नवी दृष्टी देतो व पुढील मार्ग सुलभ करतो. तसेच उद्दिष्टांद्वारे आपण संशोधनपर समस्या अधिक स्पष्टपणे मांडू शकतो. प्रस्तुत संशोधनाची पुढील उद्दिष्ट्ये ठरविण्यात आलेली आहेत.

१. महाराष्ट्राच्या सामाजिक पुनर्रचनेच्या चळवळीचा वेध घेणे.

२. तत्कालीन स्त्रीविषयक दृष्टिकोनाचा मागोवा घेणे.

३. स्त्रियांच्या बदलत जाणाऱ्या भूमिकेचा आणि सामाजिक जीवनातील स्त्रियांचा चळवळीतील सहभागाचा वेध घेणे.

४. महिला समाजसुधारकांच्या कार्यामुळे समाजावर झालेला परिणाम तपासणे.

५. स्त्रीवादी चळवळीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्राच्या स्त्री समाजसुधारकाचे मूल्यमापन करणे.

## १.४ संशोधनाची गृहितके :-

सामान्य विषय क्षेत्राचे रूपांतर ज्या संशोधन समस्येत करण्यात आलेले असते त्या संशोधन समस्येचे एक संभाव्य उत्तर किंवा स्पष्टीकरण म्हणून मांडण्यात आलेले विधान म्हणजेच गृहितके होय. संशोधन विषयाचे पूर्वज्ञान व त्यासंबंधीची मिळालेल्या माहितीच्या आधारे गृहितकृत्यांची निर्मिती केली जाते. संशोधकाने आपल्या ''महाराष्ट्राच्या सामाजिक पुनर्रचनेच्या चळवळीत सार्वजनिक जीवनातील स्त्रिया : एक आढावा'' या विषयाचा अभ्यास करतेवेळेस खालील गृहितकृत्ये धरली आहेत.

१. पाश्चात्त्य शिक्षणामुळे भारतीय स्त्रियांच्या सामाजिक स्थितीमध्ये बदल झाला.

२. भारतीय समाजसुधारकांपासून महिला समाजसुधारकांना प्रेरणा मिळाली.

३. सार्वजनिक जीवनातील स्त्रियांच्या कार्याचा प्रभाव महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनावर झाला.

४. महाराष्ट्राच्या सामाजिक पुनर्रचनेच्या चळवळीला समाजसुधारकांच्या कार्याला प्रतिक्रिया दिल्या.

५. सामाजिक स्त्रियांच्या कार्याचा महाराष्ट्रातील समाजावर प्रभाव पडलेला दिसतो.

## १.५ संशोधनाचे तथ्यसंकलन :-

सामाजिक संशोधन ही एक पद्धतशीर व वैज्ञानिक प्रक्रिया असून या प्रक्रियेद्वारे सामाजिक जीवनासंबंधी नवीन तथ्यांचा शोध घेतला जातो किंवा विद्यमान तथ्यांची व्याप्ती वाढविली जाते अथवा जुन्या तथ्यांचे पुनःस्पष्टीकरण केले जाते. अर्थात या प्रस्तुत प्रबंधामध्ये संशोधनकर्त्याने व्यापक प्रमाणात ऐतिहासिक घटनाक्रम, प्रसंग अनेक ग्रंथाच्या आधारे अभ्यासले आहेत. इतिहास हे एक सामाजिक शास्त्र असल्याने सामाजिक शास्त्रात प्रचलित असलेल्या सर्वच संशोधनपद्धती इतिहास संशोधकासाठी उपयुक्त ठरतात. आपण कोणती पद्धत वापरावयाची याची निवड संशोधकर्ता करतो.

त्या अनुषंगाने प्रबोधनचळवळीची ऐतिहासिक संशोधन पद्धतीत मागोवा घेत असताना या चळवळीशी संबंधित अनेक शहरातील प्रबोधनचळवळीशी संबंधित कार्यकर्त्यांशी प्रत्यक्ष भेटून त्याअनुषंगाने काही दुर्मिळ अप्रकाशित ग्रंथाच्या प्रती मिळविण्यात आल्या आहेत. तसेच हस्तलिखित वृत्तपत्रे, नियतकालिके, स्मरणिका इत्यादी ग्रंथाच्या प्रती मिळाल्या आहेत. काही ठिकाणी तत्कालीन कागदपत्रे

हाताळण्यात आली.  त्यामुळेच वर्णनात्मक आणि संदर्भतळटिपांच्या सहाय्याने संशोधनात्मक माहिती गोळा करून त्याची पुनःमांडणी करण्यात येणार आहे.

## १.६  संशोधनाच्या मर्यादा :-

सामाजिक शास्त्रातील संशोधनाला अनेक प्रकारच्या मर्यादा असतात.  कारण हा विषय व्यक्तिच्या विचार आणि वर्तनाशी संबंधित असल्याने त्यावर अनेक प्रकारचे प्रभाव पडत असतात.  अनेक घटनांचे परिणाम होत असतात, त्यामुळे इथे विज्ञान शाखेतील संशोधनाप्रमाणे प्रयोगशिलता व निश्चित निष्कर्ष असे काढता येत नाहीत. केवळ अनुमानाच्या आधारे काही निष्कर्ष निघतात, परंतु अशा विषयाच्या संशोधनातील पुष्कळसे काम ग्रंथालयीन साधनांच्या आधारावर अवलंबून असते. तसेच प्रस्तुत विषयाची मर्यादा ही सामाजिक पुनर्रचनेच्या चळवळीत सार्वजनिक जीवनातील स्त्रिया विशेष रूपाने सावित्रीबाई फुले, पंडिता रमाबाई, ताराबाई शिंदे, रमाबाई रानडे ते अलिकडच्या काळातील सिंधुताई सपकाळ या स्त्रियांपर्यंतच मर्यादित असल्यामुळे साहजिकच संशोधकाने त्यांनी केलेल्या नेतृत्त्वाचा व कर्तृत्त्वाचा मागोवा घेतला जाणार आहे.

## १.७  संशोधनाचा आराखडा :-

**प्रकरण पहिले : विषयाची पार्श्वभूमी व अभ्यासाचे लक्ष्य**

प्रस्तुत प्रकरणात संशोधनाचे महत्त्व, उद्दिष्ट्ये, गृहितके तसेच संशोधनाचे तथ्यसंकलन केलेले असून, त्याचबरोबर संशोधनाच्या मर्यादा, संशोधन साहित्याचा

मागोवा, संशोधनाचा आराखडा, संशोधनाचे प्रकरणीकरण व शेवटी समारोप करण्यात येईल.

**प्रकरण दुसरे : महाराष्ट्राच्या सामाजिक पुनर्रचनेची पार्श्वभूमी**

प्रस्तुत प्रकरणात महाराष्ट्रातील सामाजिक पुनर्रचनेची ऐतिहासिक पार्श्वभूमी विषद केलेली असून, सोबत सामाजिक पुनर्रचनेचा अर्थ, सामाजिक पुनर्रचनेचे स्वरूप, सामाजिक व राजकीय चळवळी, महाराष्ट्रातील सामाजिक पुनर्रचनेचा उदय व विस्तार आदींची विस्तृत चर्चा केली जाणार आहे.

**प्रकरण तिसरे : महाराष्ट्रातील समाजसुधारकांचे महिलांविषयक कार्य :–**

प्रस्तुत प्रकरणात आधुनिक काळात पाश्चात्त्य शिक्षणाने भारावून गेलेले समाजसुधारक ज्यामध्ये लोकहितवादी, गोपाळ गणेश आगरकर, महर्षी कर्वे, स्त्री उद्धाराची स्वतंत्र चळवळ म्हणून महात्मा फुले यांचे कार्य, राजर्षी शाहू महाराज यांची स्त्रीविषयक भूमिका, पंजाबराव देशमुख यांचे स्त्रीशिक्षणविषयक कार्ये, कर्मवीर भाऊराव पाटील व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी स्त्रीविषयक मांडलेले विचार व भूमिका यांचाही मागोवा प्रस्तुत प्रकरणात घेतला जाईल.

**प्रकरण चौथे : महाराष्ट्रातील सार्वजनिक जीवनील स्त्रियांच्या कार्याचा आढावा**

प्रस्तुत प्रकरणात महाराष्ट्राच्या प्रबोधन चळवळीचे नेतृत्त्व सावित्रीबाई फुले यांनी केली असून, त्यांनी मांडलेली भूमिका, त्यांनी केलेले कार्य, पंडिता रमाबाई यांची स्त्रीविषयक भूमिका, स्त्रियांच्या समस्या, स्त्रीवादी दृष्टिकोन, ताराबाई शिंदे यांनी केलेले सामाजिक कार्य, स्त्रियांविषयक भूमिका, रमाबाई रानडे यांनी प्रबोधन

चळवळीत केलेले कार्य, त्यांनी मांडलेली भूमिका व अलिकडच्या काळातील सिंधुताई सपकाळ आदींचा मागोवा प्रस्तुत प्रकरणात घेतला जाईल.

**प्रकरण पाचवे : सार्वजनिक क्षेत्रातील कर्तृत्त्ववान स्त्रियांच्या कार्याचा पडलेला प्रभाव**

प्रस्तुत प्रकरणात प्रबोधन चळवळीचे नेतृत्त्व केलेल्या स्त्रिया, त्यांनी मांडलेल्या भूमिका, त्यांनी केलेले कार्य, यांचा प्रस्तुत महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनावर कशापद्धतीने प्रभाव पडला याचा विस्तृत आढावा घेतला जाणार आहे.

**प्रकरण सहावे : उपसंहार व निष्कर्ष :–**

प्रस्तुत प्रकरणात उपसंहार व निष्कर्ष मांडण्यात येईल.

## संदर्भसूची :–


१. सरदार गंगाधर बाळकृष्ण, 'महाराष्ट्रातील सामाजिक प्रबोधनाची वाटचाल', नवनिर्माण न्यास प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, १५ ऑगस्ट, १९८६.

२. देसाई नि.स.(संपा.), 'भारतीय समाजातील स्त्रियांचे स्थान', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, प्रथम आवृत्ती, १९८७.

३. भोसले नारायण, 'महाराष्ट्रातील स्त्रीविषयक सुधारणावादाचे सत्ताकारण', द ताईची प्रकाशन, पुणे, द्वितीय आवृत्ती, २००८.

४. भांडारकर पु.ल., ''सामाजिक संशोधन पद्धती'', महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, नागपूर, प्रथम आवृत्ती, १९७३.

५. देव प्रभाकर, 'आधुनिक भारत इ.स.१८१८ ते १९७५', विद्याभारती प्रकाशन, लातूर, प्रथमावृत्ती.

६. जोशी पी.जी., 'आधुनिक जग', विद्या प्रकाशन, नागपूर, प्रथम आवृत्ती, १४ जानेवारी २००३.

७. गर्गे स.मा.(संपा.), मराठी विश्वकोष, खंड–१०, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई, प्रथम आवृत्ती, १९८४.

८. सरदार गंगाधर बाळकृष्ण, 'महाराष्ट्रातील सामाजिक प्रबोधनाची वाटचाल', नवनिर्माण न्यास प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, १५ ऑगस्ट, १९८६.

९. गरड अण्णासाहेब/सावंत बी.बी., 'महाराष्ट्रातील समाजसुधारणेचा इतिहास', कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, १९९५, प्रथम आवृत्ती, १९९५.

१०. कुंभार नागोराव (संपा.), 'सामाजिक चळवळी : काल, आज व उद्या', प्रबोधन प्रकाशन, लातूर, प्रथम आवृत्ती, डिसेंबर १९९४.

११. गेल ऑमव्हेट, 'ज्योतीबा फुले आणि स्त्री मुक्तीचा विचार', लोकवाङ्मय प्रकाशन, प्रथम आवृत्ती, २००१.

१२. भोसले नारायण, 'महाराष्ट्रातील स्त्रीविषयक सुधारणावादाचे सत्ताकारण', द ताईची प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, १९९६.

१३. कांबळे उत्तम,'राजर्षी शाहू महाराज आणि महिला मुक्ती', सुगावा प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, २००३.

१४. साळुंखे आ.ह., 'ना गुलाम ना उद्दाम!' (महाभारतातील स्त्रिया), लोकायत प्रकाशन, सातारा, पुनःर्मुद्रण, २००८.

१५. निकम गौतम,'डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि स्त्री स्वातंत्र्य', विमल किर्ती प्रकाशन, जळगाव, प्रथम आवृत्ती, २०१३.

*** संशोधक ***
**पाटील आकाश अरुण**

*** मार्गदर्शक ***
**प्राचार्य डॉ.आर.एस.फुन्ने**
**स्वर्गीय नितीन महाविद्यालय, पाथरी,**
**ता.पाथरी, जि.परभणी**